निवडणूक तात्काळ/ई-मेलद्वारे

माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या व विघटीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र


क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दिनांक:- ०६ नोव्हेंबर, २०१७

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).*

**विषय :- माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या व विघटीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम....**

**संदर्भ :-** १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१/का-८, दिनांक ०१/०६/२०१७ रोजीचे प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यक्रमाबाबतचे आदेश.
२) आयोगाचे समक्रमांकाचे दि.०७/०९/२०१७ रोजीचे मतदार यादीसंबंधातील निर्देशपत्र.

महोदय/महोदया,

भारतीय संविधान आणि "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८" च्या तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका त्यांच्या मुदत समाप्तीपूर्वी घेण्याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. ही बाब विचारात घेता राज्य निवडणूक आयोगाने माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत:-

(i) आदेश क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१/का-८, दि. ०१ जून २०१७ रोजीचा प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम, व

(ii) शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली अधिसूचना क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का-८, दि.०३ नोव्हेंबर, २०१७ अन्वये दि.०३ ऑक्टोबर, २०१७ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार संघाची मतदार यादी वापरण्याबाबत.

(iii) आयोगाचा माहे ऑक्टोबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का-८, दि.०७ जुलै २०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम.

१.२ या आदेशाप्रमाणे प्रभाग रचनेची कार्यवाही दि.०३ ऑगस्ट २०१७ रोजीच्या सुमारास पूर्ण झाल्याचे आणि दि.०१ जुलै २०१७ रोजी अस्तित्वात असलेली संबंधित विधानसभा मतदार संघाची यादीवर आधारीत संगणकीकृत पध्दतीने प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम महसुली विभागानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून माहे सप्टेंबर २०१७ मध्ये विविध टप्प्यांत पार पडलेला आहे.

२. तसेच, वरील कालावधीपैकी माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तीन टप्प्यांत प्रत्यक्ष निवडणुकीची प्रक्रिया अनुक्रमे दि.२६ सप्टेंबर, ०७ ऑक्टोबर व दि.१६ ऑक्टोबर २०१७ रोजी संबंधित जिल्ह्यांमध्ये पार पडलेली आहे.

३. माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ मध्ये मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित ग्रामपंचायतींसाठी प्रत्यक्ष निवडणुकीची प्रक्रिया माहे डिसेंबर २०१७ मध्ये पार पडणार असल्याने या ग्रामपंचायतींसाठी याआधी दि.०१ जुलै २०१७ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार संघाची यादी ग्राह्य धरून राबविण्यात आलेला प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम अलिकडील दिनांक गृहीत धरून पुन्हा राबविणे क्रमप्राप्त झाले आहे.

वरील बाबी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

## आदेश

२.१ सुधारीत मतदार यादी कार्यक्रमाची व्याप्ती (दि.०३ ऑक्टोबर २०१७ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार संघाची यादी ग्राह्य धरुन)

(i) माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ज्यांची प्रभाग रचना दि.०३ ऑगस्ट २०१७ च्या सुमारास पूर्ण झालेली आहे.

(ii) सदर मतदार यादी कार्यक्रमामध्ये रिक्त पदांच्या पोट निवडणूकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात येऊ नये.

**३. वरील मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील:**

| | | |
|---|---|---|
| (i) प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार | दिनांक १४/११/२०१७ |
| (ii) हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | मंगळवार | दिनांक १४/११/२०१७ ते |
| | सोमवार | दिनांक २०/११/२०१७ पर्यंत |
| (iii) प्रभागनिहाय मतदार यादीची जाहीर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे | शुक्रवार | दिनांक २४/११/२०१७ |

**४. प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी तयार करणे:**

४.१ सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम दि.०३ ऑक्टोबर, २०१७ हा विधानसभा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक मानून संगणकीय आज्ञावलीप्रमाणे राबविण्यात यावा.

**४.२ प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करून घ्यावी.**

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींचा समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि त्या ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे (म्हणजेच संबंधित ग्रामपंचायतींतील विधानसभेच्या मतदार यादीत समाविष्ट असलेले सर्व मतदार त्या ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांसाठीच्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत तसेच, संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीबाहेरील मतदार त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत) याची खात्री करावी.

आ) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का-५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

इ) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दिनांक ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ई) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यांमधील दुरूस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/४/२०१५ चे आदेश)

**५. प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे.**

प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार/नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारूप मतदार यादीला दि.१४/११/२०१७ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

**६. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे.**

६.१ दि.१४/११/२०१७ ते दि.२०/११/२०१७ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करून प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त पुढीलप्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करता येईल:-

i. लेखनिकांच्या काही चुका

ii. दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार

iii. संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करणे.

६.२ सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर वरीलप्रमाणे विचार करून त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात, जेणेकरून पुढील काळात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत.

७. **प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे:**

अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना दि.२४/११/२०१७ रोजी खाली नमूद केलेल्या मुद्दा क्र.८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

८. प्रारूप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

अ) ग्रामपंचायत, तलाठी सजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील सूचना फलकांवर

ब) स्थानिक वृत्तपत्रे

क) स्थानिक केबल टि.व्ही.

९. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या **मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. (संदर्भ: शासनाच्या महसूल व वन विभागाचे दि.२४ एप्रिल २०१७ रोजीचे परिपत्रक)**

१०. मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखाद्या ग्रामपंचायतींबाबत **न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास** त्या ठिकाणचा मतदार यादी कार्यक्रम रद्द करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

११. मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्ह्याच्या मुख्य **कार्यकारी अधिकारी व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा.** आपल्या कामाचा आढावा मा. आयुक्त यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी घेण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

१२. आयोगाकडून देण्यात येणाऱ्या मतदार यादीच्या अंमलतबाजवणी संदर्भात आयोगाच्या नोडल अधिकारी (संगणकीकरण) यांच्याकडून आज्ञावली प्राप्त करुन घेण्यात यावी. यामध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास दूरध्वनी अथवा ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

**नोडल अधिकारी ( श्री. नंदलाल कुचे, श्रीमती शीतल चव्हाण, श्री. समीर गंदपवार, श्री. रितेश माटे दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८८६९५०, ई-मेल-** sec.mh@gov.in, avinash.sanas@nic.in

१३. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१४. **सदर प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.**

मा राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

सोबत: परिशिष्ट

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते **अनुदान तात्काळ वितरित** करण्याची व्यवस्था करावी.

२) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व).

**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.**

४) संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

५) कक्ष अधिकारी यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

६) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

७) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

८) निवड नस्ती.

(परिशिष्ट)

*(आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८, दि. ०६/११/२०१७ रोजीच्या पत्रासोबतचे सहपत्र.)*

**माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या व विघटीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.**

**(मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक मंगळवार दि.०३/१०/२०१७)**

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार दि.१४/११/२०१७ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | मंगळवार दि.१४/११/२०१७ ते सोमवार दि.२०/११/२०१७ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय मतदार यादीची जाहिर नोटीस प्रसिध्द करणे व अंतिम यादी प्रसिध्द करणे. | शुक्रवार दि. २४/११/२०१७ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Users\vinod.chavan\Desktop\प्रभाग रचना, मतदार यादी व निवडणूक कार्यक्रम सन २०१८.docx

**RNI No. MAHBIL /2009/31748**
**Reg. No. MCS /174/2016 -18**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

वर्ष ३, अंक ५४] शुक्रवार, नोव्हेंबर ३, २०१७/कार्तिक १२, शके १९३९ [पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ नोव्हेंबर २०१७

**आदेश**

क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र. क्र. ६/का. ०८.—दिनांक २ जून २०१७ च्या (**राजपत्र** प्रसिद्धी दिनांक ५ जून २०१७) आदेशात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १०-अ व १२ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये अंशतः बदल करण्यात येत असून मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ या दिवशी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, अधिनियमांतर्गत माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित व विघटीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित मतदार यादी तयार करण्यासाठी वापरण्यात येईल, असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

**आरती सरवदे-आहेर,**
तहसीलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.